
# विनम्र अभिवादन



डॉ. आप्पासाहेब पवार

# प्र ति ज्ञा प त्र

डॉ. आप्पासाहेब पवार : जीवन आणि कार्य (1906--1981) या नावाचा लघुशोध प्रबंध मी लिहिलेला आहे आणि इतिहास विषयातील एम्.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला आहे. या लघुशोध प्रबंधासाठी वापरलेल्या संदर्भसाधनांचा योग्य निर्देश केलेला आहे.

कोल्हापूर.

दि. : 3-10-94

Jadhav BM

कु. भाग्यश्री माधवराव जाधव.

**इतिहास विभाग**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**प्र मा ण प त्र**

---

प्रमाणपत्र देण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या सामाजिक शास्त्र शाखेतील इतिहास विषयातील एम्.फिल. पदवीसाठी **कु. भाग्यश्री माधवराव जाधव** हिने सादर केलेल्या **डॉ. आप्पासाहेब पवार : जीवन आणि कार्य (1906–1981)** या लघुशोध प्रबंधातील कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली करण्यात आलेले आहे.

तिचे कार्य अस्सल आहे आणि या लघुशोध प्रबंधासाठी उपयोगात आणलेल्या संदर्भसाधनांचा योग्य निर्देश करण्यात आलेला आहे. हा लघुशोध प्रबंध परीक्षणासाठी तयार असून, तो परीक्षणासाठी विद्यापीठाकडे पाठविण्याची मी शिफारस करीत आहे.

कोल्हापूर.

दि. 3-10-94.

**डॉ. भा. दे. खणे,**

इतिहास विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

# अ नु क्र म णि का


| अनुक्रम | प्रकरण | पृष्ठांक |
|---|---|---|
| | प्रास्ताविक. | |
| 1. | डॉ. आप्पासाहेब पवार : जीवन चरित्र (धावता आढावा). | ०१ |
| 2. | डॉ. आप्पासाहेब पवार : विविध शैक्षणिक पदावरील कार्य. | १५ |
| 3. | डॉ. आप्पासाहेब पवार : शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु. | 39 |
| 4. | डॉ. आप्पासाहेब पवार : एक इतिहास संशोधक. | ८५ |
| 5. | उपसंहार. | 137 |
| | संदर्भ ग्रंथ सूची | 148 |
| | परिशिष्ट | 156 |

# प्रा स्ता वि क

डॉ. आप्पासाहेब पवार : जीवन आणि कार्य (1906--1981) हा लघुशोध प्रबंध शिवाजी विद्यापीठाला सादर करताना मला अत्यानंद होत आहे. कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक व प्राचार्य, एस्.एस्.सी. बोर्डाचे अध्यक्ष, जुन्या मुंबई राज्याचे शिक्षण सहसंचालक व शिक्षणसंचालक, महाराष्ट्र राज्याचे शिक्षणसंचालक, कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु व शिल्पकार डॉ. आप्पासाहेब पवार यांनी आपले सर्व आयुष्य महाराष्ट्रातील शिक्षण प्रसारासाठी घालविले. नवीन पिढी सुबुध्द, सुशील व कर्तबगार बनविण्याचे पवित्र कार्य अविश्रांतपणे त्यांनी केले. शिक्षणाला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व असून, शिक्षणाने माणूस शहाणा होतो आणि प्रतिकुल परिस्थितीशी झुंज देण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी येते, हे त्यांनी आपल्या कार्याने सिध्द करुन दाखविले.

महात्मा जोतिबा फुले, राजर्षि शाहू महाराज यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा वारसा डॉ. आप्पासाहेब पवार यांनी आपल्यापरीने पुढे नेला. ते जसे शिस्तप्रिय व अभ्यासू प्राध्यापक होते, तसेच ते उत्तम प्रशासकही होते. यशस्वी कुलगुरु म्हणून त्यांची कामगिरी चिरस्मरणीय ठरली. प्रशासकाच्या खुर्चीत बसलेले असतानाही त्यांनी त्यांच्या आवडीच्या इतिहास विषयाच्या संशोधनाकडे दुर्लक्ष केले नाही. मराठा इतिहासाचे वास्तव दर्शन इतिहास अभ्यासकांना व इतिहासप्रेमींना व्हावे म्हणून त्यांनी अतिशय परिश्रमपूर्वक दुर्मिळ कागदपत्रें संपादित करुन, ताराबाईकालीन व जिजाबाईकालीन कागदपत्रांचे खंड प्रकाशित केले. मराठा इतिहास संशोधन कार्यात त्यांनी स्वतः तर मोलाची भर टाकलीच, पण संशोधनाचे एक नवे दालन इतिहास संशोधकांना खुले करुन दिले.

अशा या थोर कर्मयोग्याचे, शिक्षण महर्षिचे, ज्ञानतपस्वीचे, भगीरथाचे निर्व्याज चारित्र्य व सृजनशील मन, इतिहासाचा गाढा व्यासंग आणि दैदिप्यमान शैक्षणिक कार्य सर्वांसमोर आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न या लघुशोध प्रबंधात केलेला आहे. त्यांचे अष्टावधानी व्यक्तिमत्व भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे चिरंतन मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

या निमित्ताने डॉ. आप्पासाहेब पवार यांचे चैतन्यमय जीवन आणि स्फूर्तिदायक कार्य अभ्यासण्याची सुवर्णसंधी मला लाभलेली आहे. ही अमोल संधी उपलब्ध करुन देण्यात मला अनेकांनी प्रत्यक्ष--अप्रत्यक्ष सहकार्य करुन, उत्तेजन दिलेले आहे. या सर्वांचे ऋण व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

माझे मार्गदर्शक डॉ.भा.दे.खणे यांनी याकामी अतिशय आस्थेने व सातत्याने मला मार्गदर्शन केले आहे. त्यांनी माझ्यासाठी घेतलेले परिश्रम, दिलेले प्रोत्साहन आणि त्यांचा लाभलेला कौटुंबिक जिव्हाळा हे सर्व विसरता न येण्यासारखे आहे. माझ्या या गुरुवर्यांची मी मनःपूर्वक ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रमुख डॉ.व.श.कदम, डॉ.भ.रा.कांबळे, डॉ.अ.रा.भोसले, डॉ.म.आ.लोहार, डॉ.मा.प.पाटील, डॉ.सौ.पद्मजा आ.पाटील, डॉ.सौ.नंदा द. पारेकर यांच्याकडूनही मला प्रोत्साहन मिळाले आहे. याबद्दल मी या सर्व गुरुजनांची आभारी आहे.

श्री.बाबासाहेब माने, अध्यक्ष, पंचक्रोशी शिक्षण मंडळ, श्री. मोहनराव पाटील, प्राचार्य, सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, श्री. प्रल्हादराव भोसले, प्राचार्य, ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स आणि व्यवस्थापकीय समिती, पंचक्रोशी शिक्षण मंडळ, रहिमतपूर, जि. सातारा यांचे बहुमोल सहकार्य व प्रोत्साहन लाभले आहे. या सर्वांची मी आभारी आहे.

इस्लामपूर, जि. सांगली येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य मा. विश्वास सायनाकर, माझे वडील व इतिहास विभाग प्रमुख प्रा.मा.तु.जाधव, प्रा.बा.ग.पाटील, भूगोल विभागाचे प्रा.दि.बा.पाटील यांच्या सदिच्छा माझ्या पाठीशी आहेत, यांचे ऋण व्यक्त करण्याची संधी या निमित्ताने मला मिळत आहे.

कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांचे एक चाहते व स्वीय सहाय्यक श्री. रोकडेसाहेब, शिवाजी विद्यापीठाच्या बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातील श्री. बापूसो माने, राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य व ग्रंथालयीन सेवक वर्ग, शाहू संशोधन केंद्राचे प्रमुख व त्यांचे कर्मचारी, कोल्हापूरच्या दै.पुढारीचे व दै.सत्यवादीचे आणि पुण्याच्या दै.केसरीचे संपादक व त्यांचे कर्मचारी, पुण्याचे आमचे पाहुणे डॉ. दत्तात्रय जाधव, प्रा.किसनराव जाधव आणि श्री. सहयाद्री घोरपडे, या सर्वांनी

डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जीवन–कार्याविषयी माहिती उपलब्ध करुन देण्यात बहुमोल मदत केली आहे. या सर्वांचे मी आभार व्यक्त करते.

माझे आजोबा श्री. तुकाराम जाधव, आजी सौ. अनुसया जाधव, आई सौ. विंध्यावली जाधव, मामंजी श्री. गणपती जाधव, सासूबाई सौ. सुंदराबाई जाधव यांचा आशिर्वाद मला नेहमीच लाभला आहे. माझी बहिण कु. अनिता जाधव व पुतणी सौ. सुनिता रोटे या दोघींनी याकामी खूपच मदत केली आहे. माझे पति प्रा.म.ग.जाधव, मानसशास्त्र विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण--इस्लामपूर, जि. सांगली यांचे या संशोधन कार्यात खूपच सहकार्य व प्रोत्साहन लाभलेले आहे. या सर्वांचे ऋण शब्दातीत आहे.

संचालक, यशश्री टायपिंग सेंटर, कोल्हापूर यांनी सुबक टंकलेखनाचे आणि संचालक, अभिनंदन प्रेस, कोल्हापूर यांनी छपाई व बांधणीचे काम अल्पावधीत पूर्ण करुन दिले आहे, त्यामुळे हा लघुशोध प्रबंध वेळेत तयार होऊ शकला. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

शेवटी, या संशोधन कार्यासाठी ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले, प्रोत्साहन दिले आणि माझ्यासाठी सुयश चिंतिले, त्या सर्व ज्ञात–अज्ञातांचे मी मनःपूर्वक ऋण व्यक्त करते.

कोल्हापूर.
दि.

कु. भाग्यश्री माधवराव जाधव